

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक २९२ * नांदेड * सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीर, विरोधकांनी टीकेऐवजी मदतीसाठी पुढे यावे- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे





नांदेड (प्रतिनिधी)– सध्या राज्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, त्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

नांदेड उत्तर मतदारसंघातील विकासकामांचा लोकार्पण सोहळा आणि वाडी (बुद्रुक) येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी आयोजित केलेल्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. हेमंत पाटील, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबुराव पाटील कोहळीकर, आ. भीमराव केराम, महापौर कविता मुळे, आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपविभागीय अधिकारी सचिन खल्ळाळ, तहसीलदार संजय वारकड, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गळधर यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यावर दुष्काळाचे संकट असताना विरोधकांनी राजकारण न करता शेतकऱ्यांना मदत कशी करता येईल, यासाठी पुढे यायला हवे. पण ते कोणत्या ना कोणत्या कारणावरून केवळ टीका करत आहेत. आम्ही टीकेला उत्तर टीकेने नाही, तर कामातून देतो.

वाडी बुद्रुक येथील हे रुग्णालय नांदेड उत्तरसह शेजारील तालुक्यातील रुग्णांसाठी वरदान ठरणार आहे. या रुग्णालयात ज्या उर्वरित सोयी-सुविधांची मागणी करण्यात आली आहे, त्याची तातडीने पूर्तता केली जाईल. येथे कामचुकारपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. नांदेडच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असेही ते म्हणाले.

शेतकऱ्यांना थेट मदत आणि सावकारांना इशारा

शेतकऱ्याची दिवाळी काळी होऊ नये म्हणून तातडीने ५ हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा केले जात आहेत. खाजगी फायनान्स, सावकार आणि बँकांनी शेतकऱ्यांना त्रास देऊ नये, अन्यथा त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. शेतकऱ्यांनी कुठल्याही संकटाने खचून जाऊ नये, शिवसेना आणि सरकार तुमच्या पाठीशी आहे, असा विश्वास त्यांनी दिला.

यावेळी त्यांनी अंधारात येऊन रुग्णालयाचे उद्घाटन करणाऱ्या उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांवरही निशाणा साधला, हे योग्य नसल्याचे ते म्हणाले.

हदगावमध्ये आ. बाबुराव पाटील कोहळीकर यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने १०० लग्न मोफत लावून देण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले. या रुग्णालयात लवकरच सिटीस्कॅन, डायलिसिस सुविधा सुरू करून १०० वरून २०० खाटा करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

मान्यवरांची मनोगते

आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर म्हणाले, आमदार बालाजीराव कल्याणकर हे बोलण्यापेक्षा कामावर भर देणारे आमदार आहेत. त्यांनी केलेल्या सर्व मागण्या मंजूर केल्या जातील.

माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण म्हणाले, नांदेडची आरोग्य सेवा झपाट्याने वाढत आहे. विष्णुपुरी येथे १००० खाटांचे रुग्णालय कार्यरत आहे, तर एसबीआयच्या (पान ५ वर...)

रामलीला मैदानात इंडिया आघाडीची अभूतपूर्व रॅली, तब्बल २० पक्ष एकवटले



नवी दिल्ली (प्रतिनिधी)– ज्ञानेशकुमार यांच्याराजीनाम्याच्या आणि एसआयआरच्या निषेधार्थ इंडिया ब्लॉकने दिल्लीत अभूतपूर्व रॅली काढली. चार तास चाललेल्या या आंदोलनात २० विरोधी पक्षांनी सहभाग घेतला. डाव्या पक्षाचे नेते एम. ए. बेबी, तेजस्वी यादव, मल्लिकार्जुन खर्गे, अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती आणि अखेरीस राहुल गांधी यांनी रामलीला मैदानावर भाषणे दिली.

यावेळी राहुल गांधी म्हणाले, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मतचोरीचा कट रचला आहे आणि त्यांना तुरुंगात जायलाच हवे. मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, ते अंडरवर्ल्डमध्ये गेले तरी आम्ही त्यांना शोधून परत आणू. आम्ही त्यांना सोडणार नाही.

अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशचा उल्लेख करत म्हटले की, जे एकदा उत्तर प्रदेशातून आले होते, ते आता उत्तर प्रदेशातूनच निघून जातील. जर उत्तर प्रदेशातील लोकांनी त्यांचे चांगले स्वागत केले,

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६


पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308





जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

बांगलादेशातील महागाई अन् समस्यांचा डोंगर

येणकेण प्रकारे भारताला त्रास देणाऱ्या आणि स्वतःच्या देशांमध्ये राजकीय अस्थैर्य असलेल्या बांगलादेशासमोरील महागाईचे संकट भस्मासुरासारखे वाढले आहे. ही महागाई आता केवळ अन्नधान्याच्या किमती वाढण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. ही महागाई अर्थव्यवस्थेतील खोलवरच्या संरचनात्मक त्रुटींचे प्रतिबिंब बनत आहे. आशियाई विकास बँकेच्या अंदाजानुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षात बांगलादेशातील सरासरी महागाई ८.७ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून पुढच्या आर्थिक वर्षात ती ९ टक्क्यांवर जाऊ शकते. महत्त्वाचे म्हणजे, दक्षिण आशियातील काही शेजारी देश महागाई नियंत्रणात आणत असताना बांगलादेशातील किंमतवाढ कायम राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रश्न केवळ महागाई किती आहे, हा नसून ती कमी का होत नाही, हा आहे. महागाईची सुरुवात अन्नधान्याच्या किमती, इंधनाचे वाढते दर, आयातीचा खर्च आणि चलनाच्या अवमूल्यनातून झाली असली, तरी आता तिची मुळे अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत व्यवस्थेत खोलवर रुजली आहेत. बाजारातील अपुरी स्पर्धा, पुरवठा साखळीतील अकार्यक्षमता, वाहतूक आणि साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा, काही मोजक्या घटकांकडे बाजाराचे केंद्रीकरण आणि धोरणात्मक निर्णयांमधील विलंब यामुळे महागाईला चिवटपणा आला आहे. महागाईचे सर्वाधिक चिंताजनक रूप म्हणजे खर्च वाढला की, वस्तूंच्या किमती तातडीने वाढतात; परंतु खर्चाचा दबाव कमी झाला तरी किमती त्याच वेगाने खाली येत नाहीत. याचा अर्थ बाजारातील स्पर्धात्मक यंत्रणा प्रभावीपणे काम करत नाही. ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी बाजारावर देखरेख करणाऱ्या संस्थांची भूमिका त्यामुळे महत्त्वाची ठरते. बाजारात मोजक्या व्यापारी किंवा व्यावसायिक गटांचे वर्चस्व असेल, तर ग्राहकांकडे पर्याय मर्यादित राहतात. अशा परिस्थितीत जागतिक बाजारातील किंमतवाढीचा भार ग्राहकांवर त्वरेने टाकला जातो; मात्र किंमती कमी करण्यासाठी तितकीच तत्परता दाखवली जात नाही. त्यामुळे महागाई ही केवळ 'पुरवठ्याची समस्या' न राहता बाजाररचनेची समस्या बनते. महागाई नियंत्रणासाठी मध्यवर्ती बँकेकडून व्याजदर वाढविणे हे पारंपरिक आर्थिक औषध आहे. कर्ज महाग झाले की, मागणी कमी होते आणि त्यातून किंमतवाढीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु बांगलादेशातील सध्याच्या परिस्थितीत हे औषध एकट्याने पुरेसे ठरणार नाही. जर समस्या वाहतूक, साठवणूक, वितरण, बाजारातील एकाधिकार आणि पुरवठा साखळीतील अकार्यक्षमतेची असेल, तर व्याजदर वाढवून या त्रुटी दूर होणार नाहीत. उलट उद्योगांसाठी कर्ज महाग झाल्यास उत्पादन आणि गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच मौद्रिक धोरणासोबत पुरवठा व्यवस्थेतील सुधारणांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे. महागाईच्या संकटाला सरकारची आर्थिक स्थिती आणखी गुंतागुंतीची बनवत आहे. सामाजिक सुरक्षा योजना आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च वाढत असताना महसूल उभारणी अपेक्षेइतकी मजबूत नसल्यास सरकारला मोठ्या प्रमाणावर कर्ज घ्यावे लागते. मोठ्या प्रमाणातील सरकारी कर्जामुळे खासगी क्षेत्रासाठी उपलब्ध भांडवलावर दबाव निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे वित्तीय शिस्त, महसूल वाढ आणि खर्चाचे प्राधान्यक्रम यांचा पुनर्विचार करणे अपरिहार्य आहे. बांगलादेशासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेत चलनाचे अवमूल्यन झाले की, आयात महाग होते. इंधन, कच्चा माल आणि अन्नधान्याच्या आयातीचा खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम अखेरीस सामान्य ग्राहकांच्या खिशावर होतो. त्यामुळे महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ किरकोळ बाजारातील किंमतींवर लक्ष ठेवणे पुरेसे नाही. परकीय चलन बाजार, ऊर्जा उपलब्धता, आयात धोरण आणि देशांतर्गत उत्पादन यांचा एकत्रित विचार करावा लागेल. विशेषतः ऊर्जा संकटाचा उद्योगांवर परिणाम होत असेल तर उत्पादन घटू शकते आणि पुरवठा कमी झाल्याने किंमती आणखी वाढू शकतात. त्यामुळे स्वस्त आणि विश्वासार्ह ऊर्जापुरवठा हा महागाईविरोधी धोरणाचाच एक भाग मानला पाहिजे. बांगला देशासमोरील महागाईचे संकट दाखवून देते की किंमतवाढीशी लढण्यासाठी एका धोरणावर अवलंबून राहणे धोकादायक आहे. बाजारातील स्पर्धा वाढविणे, साठेबाजीवर नियंत्रण, वाहतूक व गोदामांची क्षमता वाढविणे, कृषी उत्पादनाच्या वितरणातील मध्यस्थांची कार्यक्षमता सुधारणे, ऊर्जा पुरवठा स्थिर करणे आणि चलनविषयक धोरणात विश्वासार्हता निर्माण करणे आवश्यक आहे. याचबरोबर सरकारने सामाजिक संरक्षणाच्या योजना अधिक लक्ष्यित करणे गरजेचे आहे. महागाईचा सर्वाधिक फटका गरीब आणि मध्यमवर्गाला बसतो. त्यामुळे महागाई कमी होईपर्यंत त्यांना आधार देणाऱ्या योजनांची गरज आहे; मात्र त्यासाठी अनियंत्रित सरकारी खर्च वाढविण्याऐवजी अधिक कार्यक्षम आणि लक्ष्यित वित्तीय धोरण आवश्यक आहे. या देशातील महागाईचा अनुभव संपूर्ण दक्षिण आशियासाठी महत्त्वाचा धडा आहे. महागाई ही केवळ आकड्यांची समस्या नसते; ती बाजारव्यवस्था, सरकारी वित्त, उत्पादनक्षमता आणि प्रशासनाच्या गुणवत्तेची संयुक्त परीक्षा असते. किंमती वाढण्याचे तात्कालिक कारण शोधून उपाययोजना करण्यापेक्षा त्या वारंवार वाढण्याची संरचनात्मक कारणे दूर केली, तरच अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळू शकते. अन्यथा महागाई नियंत्रणाचे प्रत्येक प्रयत्न तात्पुरते ठरतील आणि त्याचा सर्वाधिक भार सामान्य नागरिकालाच सहन करावा लागेल.

खेळातून शिक्षण : आनंददायी शिक्षणाची नवी दिशा!



शिक्षण म्हणजे केवळ पुस्तके, परीक्षा, गुण आणि पाठांतर नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविण्याची प्रक्रिया होय. शिक्षण घेताना विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा निर्माण झाली, शिकण्याची आवड वाढली आणि प्रत्येक गोष्ट अनुभवातून समजली, तर ते शिक्षण खऱ्या अर्थाने प्रभावी ठरते. यासाठीच आजच्या शिक्षणपद्धतीत 'खेळातून शिक्षण' आणि 'आनंददायी शिक्षण' या संकल्पनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. खेळता खेळता शिकणे ही मुलांची नैसर्गिक प्रवृत्ती असून, याच प्रवृत्तीचा उपयोग शिक्षणासाठी करणे ही काळाची गरज आहलहान मुलांना सतत एका जागी बसवून शिकविण्यापेक्षा खेळ, गाणी, गोष्टी, चित्रे, कृती आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून शिकविले, तर त्यांना विषय सहज समजतात. उदाहरणार्थ, गणितातील बेरीज-वजाबाकी खेळण्यांमधून, मोजणीच्या खेळांमधून शिकविता येते.

भाषेचे ज्ञान गोष्टी, कविता, शब्दखेळ आणि संवादातून देता येते. विज्ञानातील संकल्पना प्रयोग, निरीक्षण आणि प्रत्यक्ष कृतीतून स्पष्ट करता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिकणे अधिक रंजक, सहज आणि कायमस्वरूपी होते. पारंपरिक शिक्षणपद्धतीत अनेकदा विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा ताण, परीक्षेची भीती आणि गुणांची स्पर्धा लादली जाते. परिणामी शिक्षण हा आनंदाचा अनुभव न राहता दबावाचा विषय बनतो. काही विद्यार्थ्यांना अभ्यासाची भीती वाटते, तर काहींचा आत्मविश्वास कमी होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणात आनंद, उत्सुकता आणि सहभाग यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याचे, चुका करण्याचे आणि स्वतःच्या अनुभवातून शिकण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजखेळातून शिक्षण घेताना विद्यार्थ्यांचा केवळ बौद्धिक विकास होत नाही, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासालाही चालना मिळते. सांघिक खेळांमुळे सहकार्याची भावना, नेतृत्वगुण, शिस्त, निर्णयक्षमता आणि खिलाडूवृत्ती विकसित होते. जिंकण्याबरोबरच पराभव स्वीकारण्याची मानसिकता तयार होते. खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून जीवनशिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्येही अनुभवाधारित, कृतीप्रधान आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना केवळ माहिती देण्याऐवजी त्यांना विचार करायला, शोध घ्यायला आणि प्रत्यक्ष कृतीतून शिकायला प्रवृत्त करणे अपेक्षित आहे. यासाठी शाळांनी अभ्यासक्रमात खेळ, प्रकल्प, प्रयोग, शैक्षणिक सहली, स्थानिक परिसराचा अभ्यास आणि विविध सर्जनशील उपक्रमांचा समावेश करणे गरजेचे आहे.या प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकांनी केवळ माहिती देणारे न राहता विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरित करणारे मार्गदर्शक बनले पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याची आवड, क्षमता आणि शिकण्याची गती वेगवेगळी असते. हे लक्षात घेऊन अध्यापनाच्या पद्धतीत विविधता आणलीपाहिजे. वर्गातील वातावरण भयमुक्त, संवादपूर्ण आणि उत्साहवर्धक असेल, तर विद्यार्थी अधिक आत्मविश्वासाने शिकतातपालकांनीही मुलांच्या शिक्षणाकडे केवळ गुणांच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांच्या कौशल्यांचा, आवडीचा आणि सर्जनशीलतेचा विचार केला पाहिजे. मुलांना खेळण्यासाठी वेळ देणे, त्यांच्या प्रश्नांना प्रोत्साहन देणे आणि नवीन गोष्टी शिकण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

प्रत्यक्ष मैदानी खेळ, समूहातील उपक्रम आणि निसर्गाच्या सान्निध्यातून मिळणारे शिक्षण यांची जागा कोणतेही डिजिटल माध्यम घेऊ शकत नाही.शेवटी, शिक्षणाचा खरा उद्देश केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविणे नसून जिज्ञासू, आत्मविश्वासू, सर्जनशील आणि जबाबदार नागरिक घडविणे हा आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर शिकताना आनंद दिसला, त्यांच्या मनात नवनवीन प्रश्न निर्माण झाले आणि शाळेत जाण्याची उत्सुकता वाढली, तर ते शिक्षण यशस्वी झाल्याचे लक्षण आहे 'खेळातून शिक्षण आणि आनंदातून ज्ञान' हा दृष्टिकोन प्रत्येक शाळेने आणि शिक्षकाने स्वीकारण्याची गरज आहे. शिक्षणाचा प्रवास आनंददायी झाला, तर ज्ञानाची गोडी आपोआप निर्माण होईल.

मुलांच्या बालपणावर अभ्यासाचा बोजा न लादता त्यांच्या कुतूहलाला पंख देण्याची वेळ आली आहे. कारण आनंदाने शिकलेले ज्ञान अधिक काळ टिकते आणि अनुभवातून मिळालेले शिक्षण आयुष्यभर उपयोगी पडते. त्यामुळे खेळाला शिक्षणाचा अविभाज्य भाग बनवून आनंददायी शिक्षणाची नवी दिशा निर्माण करणे हीच काळाची खरी गरज आहे. पुस्तकांचे ओझे आणि अभ्यासाचा कंटाळा दूर करण्यासाठी खेळ हा उत्तम मार्ग आहे. खेळातून मुले नकळतपणे कठीण संकल्पनाही सहज शिकतात. शिक्षणासाठी तणावमुक्त आणि आनंददायी वातावरण तयार होते. खेळामुळे मुलांची शारीरिक आणि मानसिक ऊर्जा योग्य ठिकाणी वापरली जाते, ज्यामुळे त्यांची वर्गातील एकाग्रता सुधारते. आजच्या डिजिटल युगात मुले मोबाइल आणि टीव्ही स्क्रीनला जास्त चिकटलेली असतात. खेळातून शिक्षण दिल्यास मुलांची शारीरिक हालचाल होते, जी त्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

पळणे, उड्या मारणे, लपंडाव, विटीदांडू किंवा पकडापकडी यांसारख्या खेळांमुळे मुलांचे स्नायू बळकट होतात आणि शारीरिक समन्वय सुधारतो. मणी ओवणे, कॅरम खेळणे किंवा चेंडू पकडणे यामुळे एकाग्रता वाढते. चित्रकला, हस्तकला किंवा विज्ञानाचे छोटे प्रयोग यांसारख्या कृतियुक्त शिक्षणामुळे हाताच्या आणि डोळ्यांच्या समन्वयाचा विकास होतो. चित्रकला, मातीचे खेळ किंवा कागदाच्या वस्तू बनवल्याने मुलांची कल्पनाशक्ती, सर्जनशीलता वाढीस लागते. केवळ ऐकलेले किंवा वाचलेले मुले लवकर विसरू शकतात; परंतु स्वतःच्या हाताने केलेले काम किंवा खेळातून शिकलेली गोष्टी मुले आयुष्यभर विसरणार नाहीतचिमुकल्या मुलांना कृतीतून आनंददायी शिक्षण देण्यासाठी पालकांनी छोट्या छोट्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजे. पालकांनी मुलांच्या मुक्त खेळाला प्रोत्साहन द्या. मुलांना स्वतःचे खेळ स्वतः तयार करू द्या. यामुळे त्यांची निर्णयक्षमता सुधारते. पालकांनी मुलांच्या खेळात सहभागी व्हा. मुलांना खेळताना फक्त सूचना देण्याऐवजी स्वतः त्यांचे मित्र बनून खेळा. पालकांनी घरातील वस्तूंमधून मुलांना नकळत शिक्षणाकडे वळवा. महाराष्ट्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आनंददायी अभ्यासक्रम, आनंददायी शनिवारसारखे विशेष उपक्रम राबवले जातात.

सकारात्मक नातेसंबंध निर्माण होण्यास मदत होते शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये विश्वासाचे नाते तयार होते. परीक्षेचा ताण कमी होतो. या उपक्रमांमध्ये कोणतीही औपचारिक परीक्षा किंवा गुणांकन नसते, त्यामुळे मुलांवर मानसिक दडपण येत नाही. मुलांचा कृतियुक्त सहभाग वाढतो. केवळ पुस्तकी ज्ञानाऐवजी प्रयोग, हस्तकला, आणि प्रत्यक्ष कृतीतून शिकण्यावर भर दिला जातो. खेळ आणि संवाद यावर अधिक भर दिला जातो. खेळ, गोष्टी सांगणे, गटचर्चा आणि जोडीने काम केल्यामुळे मुलांमधील संवाद कौशल्य वाढते. थोडक्यात सांगायचे तर खेळातून शिक्षण हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्येही प्राथमिक स्तरावर कृतियुक्त आणि खेळातून शिक्षणावर सर्वाधिक भर देण्यात आला आहे.

-प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर
जि. छत्रपती संभाजी नगर
मो.७८८८२९७८५९

थंडीची चाहूल



थंडीची चाहूल लागली की त्याची नाविन्यपूर्ण ओळखीतून उजळून येणारी सकाळ त्यातून भासणारा हर्ष मनाला कोठून तरी सुख,आनंद आणि जिव्हाळ्याची फुंकर घालतो.

असे भासते की ,पहाटेच्या साखर झोपेला आपण जसे मिठीतुन कधीच सोडू नये तिलाच बिलगून लाडिक तिच्या खुशीत घुसून झोपावे अन् रात्र कधी संपूच नये आणि तेवढ्यात कोणी तरी आपल्या खोलीचे दार वाजवावे आणि म्हणावे , चल उठ उठ पहाट झाली चल चालायला !

बरेच दिवसांनंतर आज सकाळी चालायला जाणार होते. पहाटे ५ वाजता उठून जुजबी आवरून मॉर्निंग वॉक साठी तयार झाले आणि चालायला निघाले पुरते उजाडले तर नव्हतेच, त्यात ही थंडी मी-मी म्हणतच होती. थंडीशी प्रतिकार करत मी एका अर्धवट तुटलेल्या ओट्यावर दुसऱ्या मैत्रीणी येण्याची प्रतीक्षा करत होते. आजुबाजुला पाहिले तर मोजक्याच लोकांच्या अंगावर मफलरी अन कानटोप्या पडल्या होत्या. रोज तुडुंब चालाण्यासाठी वाहणारा रस्ता कोवळ्या उन्हाची वाट बघत पहुडला होता.

आत्ता बऱ्यापैकी वाटणारी थंडी जास्तच वाटू लागली. धुक्यात वाट काढत काढत जाताना निसर्गाच्या करामतींची मौज वाटू लागली काही अंतरात वातावरण बदलले होते. नभांगण आता हळूहळू केशरी शेला पांघरत गडद होत चालले होते. त्या केशरी रंगाने गात्रात हलकीशी ऊब तर आणली पण रानावनात मनसोक्त गच्च भरलेल्या थंडीने त्याला काही दाद लागू दिली नाही. सर्वत्र धुके पसरले होतेच, वाहत्या गारव्याने ते आता माळरानात उतरू पाहत होते. झाडांच्या पानापानातून वाट काढू पाहणाऱ्या कोवळ्या सूर्यकिरणांशी जणू काही त्याची शर्यंतच लागली असावी.

पहाटे पहाटे उठून, गार पाण्याने अजून थंडी वाजेल म्हणून तोंडही न धुता, कपाटातून खाली काढलेले स्वेटर चढवून, बगलेत हात धरून फिरायला निघालेले लोक डोळ्यासमोर असे तरळून गेले. हातमोजे वैगरे अश्या गोष्टी फारच 'वाढीव' म्हणून हात बगलेत घट्ट ठेवून चालत राहिले कि थोडीफार ऊब येईल म्हणून लोक भरभर चालू लागले. पहाटे गाड्यांच्या काचांवर जमलेले दव, त्यावर आपली कारीगरी करत अन तोंडातून वाफाळलेल्या चहासारखी वाफ काढायची स्पर्धाच जणू लागून जायची आमच्या सगळ्यांच्यात. आजही अजाणतेपणाने आलेल्या जांभईने आज मला स्पर्धक नसल्याने विजेताच केले असावे. आजही रोमारोमात थंडी भरली तर होतीच अन हातही निमूट बगलेत विसावले होते.

काही लोक सकाळच्या धुक्यात ध्यानस्थ बसल्यासारखे दिसायला लागले होते. आजूबाजूच्या शेततळ्यामध्ये तुरळकच सूर्याचे बिंब परावर्तित होऊन सगळा परीसर सोनेरी झाला होता. सर्व परिसर थंडीच्या कुशीत निवांतपणे विसावला होती. ना कुठं कसली धावपळ ना कसला माग.

आळसावलेल्या गावां-खेड्यांमध्ये आत्ताशी कुठं मंदिरे जागी झाली असेल का ? असा ही एक क्षणिक विचार मनात आला आणि आपले अस्तित्वच धुक्याच्या हवाली केले असेल का? नदीच्या पाण्याने त्या धुक्याच्या रंगात आपला रंग मिसळून बेमालूमपणे लपवला असेल का?. सूर्यप्रकाशाचा सोनेरी मुकुट घालून ढगांशी दोन हात करत डोंगर उभा असेल का? उंच उंच झाडी तर ढगात डोकं खुपसून बसले असेल का?.

पूर्वेला क्षितिजाकडे बघता आता पुरते उजाडले होते. रेंगाळलेल्या धुक्याची अजूनही मागे हटायची तयारी नव्हती. डोंगरांच्या कुशीत खोल वसलेल्या वस्त्या व गावे आता जागी होत असतील का!वाटेतील घरात असलेली लगीनघाई स्पिकरवरुन कळत होती पण तेवढाच काय तो कोलाहल. बाकी निरव शांतता.

सुवर्णमयी सकाळेने थंडीची चाहूल करून दिली. सूर्य आपल्या गतीनं वर येऊ लागला आणि आमचा घराकडं परतीचा प्रवास सुरू झाला.

-रूचिरा बेटकर,
नांदेड
मो. ९९७०७७४२११

महागाईच्या झळा सोसत साजरी होणारी दिवाळी!



दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा, मांगल्याचा आणि प्रकाशाचा सण! वर्षभरातील कष्ट, चिंता आणि दुःख विसरून चार क्षण आनंदात घालवण्याची संधी म्हणजे दिवाळी. दिवाळीच्या आगमनाने घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. घरांची साफसफाई, रंगरंगोटी, आकाशकंदील, पणत्यांची आरास, फराळाची तयारी, नवीन कपड्यांची खरेदी आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी यामुळे वातावरण आनंदमय होते. मात्र, यंदाच्या दिवाळीवरही महागाईचे सावट असल्याने सर्वसामान्यांच्या आनंदावर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे महागाईच्या झळा सोसत दिवाळी साजरी करण्याची वेळ सामान्य नागरिकांवर आली आहे.

दिवाळी आली की बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने फुलून जातात. व्यापारी आकर्षक सजावट करतात, विविध वस्तूंवर सवलती जाहीर करतात. ऑनलाइन खरेदीचे पर्यायही उपलब्ध होतात. कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मिठाई, फराळाचे साहित्य, सजावटीच्या वस्तू अशा अनेक गोष्टींची खरेदी केली जाते. मोठमोठ्या मॉलमध्ये ग्राहकांची गर्दी दिसते. मात्र, या झगमगाटाच्या पलीकडे एक वेगळे वास्तव आहे. वाढत्या महागाईमुळे अनेक कुटुंबांना दिवाळीचा खर्च भागवताना आर्थिक तारेवरची कसरत करावी लागत आहे.

साखर, तेल, तूप, डाळी, रवा, मैदा, बेसन, सुकामेवा अशा फराळासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमती वाढल्या आहेत. फळे, भाजीपाला, किराणा माल, दूध आणि मिठाई महाग झाली आहे. त्यातच नवीन कपडे, घराची सजावट, भेटवस्तू आणि इतर वस्तूंच्या खरेदीचा खर्चही वाढला आहे. घराघरांत दिवाळीचे दिवे लावण्याची इच्छा आहे; मात्र तेलाचे दर परवडत नाहीत. मुलांना नवीन कपडे घ्यावेत असे वाटते; पण हातात पुरेसे पैसे नाहीत. फराळाचे पदार्थ तयार करण्याची इच्छा असते; पण साहित्याच्या वाढलेल्या किमती पाहून गृहिणींचे आर्थिक गणित बिघडते. ही परिस्थिती केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित नसून शहरी भागातील मध्यमवर्गीय कुटुंबांनाही महागाईचा मोठा फटका बसत आहे.

विशेषतः रोजंदारीवर काम करणारे मजूर, बांधकाम कामगार, अल्पभूधारक शेतकरी, छोटे व्यावसायिक, खासगी क्षेत्रातील कमी वेतन मिळवणारे कर्मचारी आणि निवृत्तीवेतनावर अवलंबून असणारे ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी दिवाळीचा खर्च पेलणे कठीण झाले आहे. महिन्याचे घरभाडे, वीजबिल, मुलांचे शिक्षण, औषधोपचार, प्रवास आणि किराणा यांचा खर्च भागवतानाच अनेकांची दमछाक होते. अशा परिस्थितीत दिवाळीच्या अतिरिक्त खर्चाची भर पडल्याने त्यांचे आर्थिक नियोजन कोलमडते. उत्पन्न मर्यादित असताना खर्च मात्र सातत्याने वाढत असल्याने सामान्य माणसाने जगायचे तरी कसे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.


दिवाळी हा आनंदाचा सण आहे; दिखाव्याचा किंवा अवाजवी खर्चाचा नव्हे. मात्र, समाजात वाढत चाललेली दिखाऊ वृत्ती, महागड्या वस्तूंची खरेदी, प्रतिष्ठेसाठी केली जाणारी अनावश्यक उधळपट्टी यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो. इतरांच्या घरी महागड्या वस्तू आल्या म्हणून आपणही त्या खरेदी कराव्यात, अशी मानसिकता निर्माण होणे योग्य नाही. सण साजरा करताना आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. कर्ज काढून किंवा उधार पैसे घेऊन दिवाळी साजरी करण्यापेक्षा उपलब्ध उत्पन्नात आनंदाने सण साजरा करणे केव्हाही चांगले.

दुसरीकडे, सरकारनेही वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवणे, साठेबाजी आणि कृत्रिम भाववाढ रोखणे, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देणे तसेच सामान्य नागरिकांची क्रयशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. केवळ सणासुदीच्या काळात सवलती जाहीर करून महागाईचा प्रश्न सुटणार नाही. सर्वसामान्यांच्या उत्पन्नात वाढ होईल आणि जीवनावश्यक वस्तू परवडणाऱ्या दरात उपलब्ध होतील, असे दीर्घकालीन धोरण आखण्याची गरज आहे.

दिवाळीच्या दिव्यांनी प्रत्येकाचे घर उजळले पाहिजे आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलला पाहिजे. मात्र, महागाईमुळे काही घरांमध्ये दिवाळीचा आनंदही चिंतेच्या सावटाखाली हरवताना दिसतो. समाजातील गरीब आणि गरजू घटकांची दिवाळीही आनंददायी व्हावी, यासाठी सक्षम नागरिकांनी मदतीचा हात पुढे करायला हवा. दिवाळीचा खरा आनंद महागड्या खरेदीत किंवा रोषणाईत नसून माणुसकी, आपुलकी, प्रेम आणि समाधानात आहे. महागाईच्या काळात काटकसरीने, नियोजनपूर्वक आणि सामाजिक भान राखून दिवाळी साजरी करणे ही काळाची गरज आहे. दिवाळीचा प्रकाश केवळ श्रीमंतांच्या घरातच नव्हे, तर समाजातील शेवटच्या घटकाच्या घरातही पोहोचला, तरच दिवाळीचा खरा अर्थ सार्थ ठरेल!

-श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

जनसामान्यांचे नेते विनय गिरडे



नवीन नांदेड भागात गेल्या पंधरा वर्षांपूर्वी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीत युवक म्हणून निवडणूक लढवून प्रचंड मताधिक्याने निवडून जनसामान्यांच्ये नेते म्हणून विनय गिरडे पाटील यांनी परिसरात नावलौकिक मिळवला. गणेशोत्सव, दुर्गा महोत्सव, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती महाराणा प्रतापसिंह महाराज जयंती साजरी करण्यासाठी त्यांचा सातत्याने पुढाकार राहिला आहे. तसेच जिल्हा नियोजन समिती, मनपा स्वेच्छा निधी, मुख्यमंत्री निधी, आमदार निधीतून प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध राहिले. सतत दुसऱ्या काळातही पुनश्च निवडणूक लढवून विजयी झाले व प्रभागातील अनेक भागात मोठ्या प्रमाणात सिमेंट काँक्रीटच्ये रस्ते, नाल्या बांधकाम, पेव्हर ब्लॉक यासह डांबरीकरण करून प्रभाग विकासात आघाडीवर राहिला.

मनपाच्या वतीने वात्सल्य नगर सोसायटीमध्ये गार्डन व कै. शंकरराव चव्हाण अभ्यासिकेची इमारत निर्माण करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती व मनपा स्वेच्छा निधी अंतर्गत एक कोटी तीस लक्ष रुपये निधीमधून अद्यावयात अभ्यासिका तयार करून यूपीएससी, राज्य सेवा आयोग व राज्यात होत असलेल्या विविध ऑनलाईन परीक्षा संदर्भात अभ्यासिकेत विविध अभ्यासक्रम पुस्तके, जनरल नॉलेज यासह स्पर्धा परीक्षा संदर्भात अभ्यासिकेची पुस्तके उपलब्ध करून गेल्या दहा वर्षांत या अभ्यासिकेद्वारे उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पाणीपुरवठा अभियंता यासह विविध पदांवर अनेक विद्यार्थी अधिकारी झाले आहेत.

गेल्या दोन वर्षीपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे प्रतोद आमदार हेमंत पाटील यांच्या माध्यमातून शिवसेना दक्षिण जिल्हा प्रमुखपदी नियुक्ती केल्यानंतर गाव तेथे शाखा गावपातळीवर अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. गत विधानसभा निवडणुकीत नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील उमेदवार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या विजयासाठी अहोरात्र परिश्रम घेऊन पुढाकार घेऊन मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्न केला. मनपाच्या वतीने स्वच्छ व सुंदर प्रभागातील संत कबीर नगर सिडको भागातील सिमेंट काँक्रीटच्ये रस्ते नाल्या बांधकाम पेव्हर ब्लॉक करून परिसर विविध निधीतून विकासात्मक केला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दोन जलकुंभासाठी जेएनयुआर अंतर्गत पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून जलकुंभ बांधुन पाठपुरावा केला आहे तर केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून कोट्यावधी निधीच्या सहाय्याने मलनिःसारण ड्रेनेज लाईन टाकुन भागातील प्रश्न सोडविला.नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या माध्यमातून सिडको परिसरातील विविध भागातील आमदार निधी अंतर्गत लाखो रुपयांची विकासकामे मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेऊन कामे मार्गी लावली आहेत.

सतत विकासासाठी अग्रेसर राहुन जिल्हा नियोजन समिती, आमदार निधी, मनपा निधी अंतर्गत वात्सल्य नगर, अनुसया नगर, ज्ञानेश्वर नगर, शाहु नगर या भागातील सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यासाठी जवळपास १५ कोटी निधी उपलब्ध करुन रस्ते तयार करून घेतले तर अनेक भागातील मंदिर परिसरात रस्ते व परिसर स्वच्छ करून घेतला. वेळोवेळी जनसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. विनय गिरडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा.

-रवी रायभोळे,
सिडको

आरोग्यमंत्री आबिटकर यांचे हिमायतनगर तालुक्यात आरोग्य सुविधांच्या सक्षमीकरणासाठी निर्देश

'आरोग्य संवाद यात्रा २०२६' अंतर्गत दरेगाव, वाळकेवाडी, दुधड, सरसम व हिमायतनगर येथील आरोग्य संस्थांची पाहणी

नांदेड(प्रतिनिधी)– ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला सुलभ, तत्पर आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य असून, आरोग्य यंत्रणेने गावातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून सेवा द्याव्यात, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज हिमायतनगर तालुक्यातील पाहणी दौऱ्यादरम्यान दिले.

'आरोग्य संवाद यात्रा २०२६' अंतर्गत आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी हिमायतनगर तालुक्यातील दरेगाव तांडा, वाळकेवाडी, दुधड, सरसम आणि हिमायतनगर येथील विविध आरोग्य संस्थांना भेटी देऊन आरोग्य सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी ग्रामस्थ, रुग्ण, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या.

दरेगाव तांड्यात नागरिकांशी संवाद ; घरोघरी आरोग्य सेवा देण्याच्या सूचना

हिमायतनगर तालुक्यातील दरेगाव तांडा येथे आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी दरेगाव तांडा येथील शेती पिकांची पाहणी करुन शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनतर त्यांनी गावात जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधून दुष्काळी परिस्थिती, स्थानिक अडचणी आणि आरोग्यविषयक समस्यांची माहिती घेतली. गावातील प्रत्येक घरापर्यंत आरोग्य सेविका व आरोग्य सेवकांनी पोहोचून आवश्यक आरोग्य तपासणी, औषधोपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन द्यावे. कोणताही नागरिक शासकीय आरोग्य सेवा व योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

वाळकेवाडी येथे आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांचे सांत्वन

वाळकेवाडी येथील दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणीदरम्यान आरोग्यमंत्री आबिटकर यांनी दिवंगत राजू ढाले यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. गरजू नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध योजना व सेवा पोहोचविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नागरिकांनी प्रतिकूल परिस्थितीतही खचून न जाता स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन केले.

आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी दुधड येथील आरोग्य उपकेंद्राला भेट देऊन तेथील उपलब्ध सुविधा, आरोग्य कर्मचाऱ्यांचे कामकाज आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती घेतली. त्यानंतर सरसम येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन रुग्णांशी संवाद साधला. केंद्रात उपलब्ध असलेल्या ईसीजी तपासणी सुविधेबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून माहिती घेत आरोग्य सेवांचा आढावा घेतला.

हिमायतनगर येथील उपजिल्हा रुग्णालयातील विविध विभागांची पाहणी करून आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी रुग्ण, नागरिक, अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला वेळेत उपचार, आवश्यक औषधे आणि दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. रुग्णसेवेत कोणतीही दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

'आरोग्य संवाद यात्रा २०२६'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांची प्रत्यक्ष पाहणी, नागरिकांशी थेट संवाद आणि आरोग्य यंत्रणेचे सक्षमीकरण यावर भर देण्यात येत आहे. आरोग्य सेवा अधिक लोकाभिमुख करून प्रत्येक नागरिकापर्यंत दर्जेदार उपचार आणि आरोग्यविषयक सुविधा पोहोचविण्याच्या शासनाच्या भूमिकेला या दौऱ्यामुळे बळ मिळाले आहे. या दौऱ्यात दरेगाव तांडा व वाळकेवाडी येथील नागरिकांना दिवाळीनिमित्त शिधा वाटपही करण्यात आले.

या पाहणी दौऱ्याप्रसंगी खासदार नागेश पाटील-आष्टीकर, आमदार बाबुराव कदम-कोहळीकर, आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर, आरोग्य सेवेचे संचालक (शहरी) डॉ. गोविंद चौधरी, संचालक (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड, उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय नवले यांच्यासह स्थानिक आरोग्य विभागाचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यातील खरीप २०२६ पीकविमा अर्जांची फेरतपासणी करा -खा. रवींद्र चव्हाण यांची मागणी



नांदेड(प्रतिनिधी)–प्रधानमंत्री पीकविमा योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये खरीप हंगाम २०२६ साठी दाखल करण्यात आलेल्या पीकविमा अर्जांची सखोल फेरतपासणी करून पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. तांत्रिक कारणांमुळे अर्ज नामंजूर होणे, त्रुटींच्या पूर्ततेसाठी अर्ज परत पाठविणे तसेच अनेक अर्ज प्रलंबित राहणे, यासंदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री पीकविमा योजना ही नैसर्गिक आपत्ती, प्रतिकूल हवामान आणि शेतीतील विविध संकटांच्या काळात आर्थिक आधार देणारी महत्त्वाची योजना आहे. मात्र, अर्ज प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी, कागदपत्रांमधील त्रुटी किंवा अर्जांच्या छाननीदरम्यान उद्भवणाऱ्या समस्यांमुळे पात्र शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शकपणे तपासणी करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये खरीप हंगाम २०२६ साठी दाखल झालेल्या पीकविमा अर्जांचा तालुकानिहाय आढावा घेण्याची मागणी केली आहे. विमा अर्ज स्वीकारण्यापासून ते त्यांची छाननी, मंजुरी, नामंजुरी आणि प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेची तपासणी करण्यात यावी, असे त्यांनी म्हटले आहे.

विशेषतः तांत्रिक कारणांचा उल्लेख करून नाकारण्यात आलेल्या अर्जांची पुन्हा तपासणी करण्यात यावी. अर्जामध्ये नेमकी कोणती त्रुटी आहे, अर्ज कोणत्या कारणामुळे नामंजूर करण्यात आला आणि संबंधित शेतकऱ्याला त्रुटी दुरुस्त करण्याची संधी देण्यात आली होती का, याची माहिती स्पष्टपणे उपलब्ध करून द्यावी. केवळ तांत्रिक कारणांमुळे पात्र शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

पीकविमा अर्जांच्या सद्यस्थितीबाबत स्पष्टता निर्माण करण्यासाठी प्रलंबित अर्जांची स्वतंत्र माहिती संकलित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नामंजूर अर्ज, त्रुटी दुरुस्तीसाठी परत पाठविलेले अर्ज, दुरुस्तीनंतर पुन्हा सादर केलेले अर्ज आणि अद्याप निर्णय न झालेली प्रकरणे यांचा स्वतंत्रपणे आढावा घेणे आवश्यक आहे.

अर्ज नामंजूर करण्यामागील कारणे संबंधित शेतकऱ्यांना लेखी स्वरूपात कळविण्यात यावीत. ज्या अर्जांमध्ये दुरुस्ती शक्य आहे, अशा शेतकऱ्यांना नियमानुसार योग्य संधी देण्यात यावी. तसेच दुरुस्त केलेले अर्ज विनाकारण प्रलंबित ठेवू नयेत आणि पात्र अर्जांवर विहित प्रक्रियेनुसार तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

जिल्ह्यात दोन गंभीर गुन्हे दाखल; खुनाचा प्रयत्न व आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कारवाई

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. यात एक खुनाच्या प्रयत्नाचा तर दुसरा आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आहे. दि. २९ ऑक्टोबर रोजी १०.३० वाजेच्या सुमारास उमर म टन दुकानासमोर, रहेमत नगर, नांदेड येथे मोटारसायकल घासल्याच्या किरकोळ कारणावरून आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व त्यांच्या मित्रावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली.

यातील आरोपी करीमखान गौस खान, अबू जलीलखान गौसखान, असलम खान गौसखान, अमनखान गौसखान, सर्व रा. रहेमत नगर, नांदेड यांनी फिर्यादी शेख जमीर शेख जावेद (वय २८ वर्षे, रा. रहेमत नगर) आणि त्याचे मित्र सोहेल खान यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने तलवार व खंजिराने मारहाण करून गंभीर जखमी केले.

याप्रकरणी फिर्यादी शेख जमीर यांच्या फिर्यादीवरून पो.स्टे. इतवारा येथे गु.र.नं. ३६२/२०२६, कलम १०९(१), ३५२, ३५१(२), ११५(२), ३(५) भारतीय न्याय संहिता-२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि देशमुख करत आहेत.

२७ आक्टोबर रोजी १०.३० वाएता ते दि. २८ आक्टोबर रोजी ५ वाजता दरम्यान कामठा बु. शिवारातील विहिरीत, ता. अर्धापूर येथे एका व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना घडली.

मयत श्रीहरी प्रभाकर बिऱ्हाडे (वय ४२ वर्षे, रा. कामठा बु., ता. अर्धापूर) यांना आरोपी शितल श्रीराम बिऱ्हाडे, वय ३५ वर्षे, रा. कामठा बु. आणि शंकरराव चव्हाण (पब्लिक शाळेवरील अधिकारी व कर्मचारी) यांनी संगनमत करून मानसिक त्रास दिला. या त्रासाला कंटाळून तणावात येऊन त्यांनी शेतातील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली, असा आरोप आहे.

किनवटच्या उच्च पातळी बंधाऱ्यात पाणी अडविण्याचा मार्ग मोकळा; बंधाऱ्याचे ९० टक्के काम पूर्ण; उर्वरित काम १५ दिवसांत होणार पूर्ण



किनवट (प्रतिनिधी) –सध्या सर्वत्र दुष्काळाचे सावट गडद होत असताना किनवटकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. पैनगंगा नदीवरील नवनिर्मित उच्च पातळी बंधाऱ्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, परतीचा पाऊस जोरदार झाल्यास या बंधाऱ्यात गेट टाकून पाणी अडविण्यात येणार आहे.

शासनाने संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता धरणे व बंधाऱ्यांमध्ये पाणी अडविण्याबाबतच्या जाचक अटी काही प्रमाणात शिथिल केल्या आहेत. त्यामुळे किनवटच्या नवनिर्मित बंधाऱ्यात पाणी साठविण्याचा मार्ग म ोकळा झाला आहे, अशी माहिती गोदावरी पाटबंधारे विभागाचे अभियंता पंकज गावंडे यांनी दिली.

किनवट शहरालगत पैनगंगा नदीवर तब्बल १०२ कोटी रुपये खर्चून १३ गेटचा उच्च पातळी बंधारा उभारण्यात येत आहे. दीड ते दोन वर्षांपूर्वी या कामाचे भूमिपूजन झाले होते. सध्या बंधाऱ्याचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित काम येत्या १५ दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या बंधाऱ्यामुळे किनवट शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असून, परिसरातील शेकडो हेक्टर शेतीलाही सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. मात्र, यंदा निसर्गाच्या अवकृपेमुळे पैनगंगा नदी हिवाळ्यातच कोरडी पडल्याने पाणीटंचाईचे संकट गडद झाले आहे. दरम्यान, सध्या देशभरात 'अर्णभ' चक्रीवादळाच्या प्रभावामुळे पावसाचे वातावरण निम र्ण झाले आहे. किनवट परिसरातही परतीचा पाऊस जोरदार झाल्यास बंधाऱ्याचे तेराही गेट बंद करून पाणी अडविण्यात येईल, अशी माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.

२४० दिवसांच्या विक्रमी कालावधीत बंधाऱ्याचे काम पूर्णत्वाकडे!

किनवटच्या पैनगंगा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्याचे भूमिपूजन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्यानंतर गोदावरी पाटबंधारे विभागाच्या देखरेखीखाली अवघ्या २४० दिवसांत रात्रंदिवस काम करून बंधाऱ्याचे काम पूर्णत्वाकडे नेण्यात आले आहे. आता केवळ गर्डरवर स्लॅब टाकण्याचे काम शिल्लक असून, तेही येत्या १५ दिवसांत पूर्ण होणार असल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे लवकरच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्षात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

तहसील कार्यालय व पंचायत समितीचे नामफलक गायब; नागरिकांची गैरसोय

शंकरनगर (प्रतिनिधी)–नायगाव येथील तहसील कार्यालय व पंचायत समितीचे नामफलक मुख्य रस्त्यावर दिसून येत नसल्याने सामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. शासकीय कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना ही कार्यालये नेमकी कुठे आहेत, हे शोधण्यासाठी इतरांकडे विचारपूस करत फिरावे लागत आहे. यामुळे नागरिकांचा मोलाचा वेळ वाया जात असून, वेळेत कार्यालयात पोहोचताना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

नायगाव शहरात विविध प्रशासकीय व वैयक्तिक कामांसाठी ग्रामीण भागातून दररोज शेकडो नागरिक येत असतात. मात्र, मुख्य रस्त्यावर स्पष्ट नामफलक अथवा दिशादर्शक फलक लावलेले नाहीत. त्यामुळे विशेषतः बाहेरगावाहून येणाऱ्या नागरिकांना कार्यालयांचा पत्ता शोधताना कसरत करावी लागत आहे. अगदी सुशिक्षित नागरिकांनाही ठिकाण शोधण्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत असल्याने, प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शासकीय कार्यालये ही सर्वसामान्य जनतेच्या सोयीसाठी आणि सेवेसाठी असतात. मात्र, मुख्य रस्त्यावर कार्यालयांची ठिकाणे दर्शवणारे साधे नामफलकच नसतील, तर नागरिकांनी जायचे कुठे? असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

नायगावमधील ही दोन्ही अत्यंत महत्त्वाची कार्यालये असल्याने तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी या समस्येकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. मुख्य रस्त्यावर तहसील कार्यालय आणि पंचायत समितीचे स्पष्ट, मोठे व दिशादर्शक नामफलक तात्काळ बसवण्यात यावेत, जेणेकरून दूरवरून येणाऱ्या नागरिकांची होणारी अडचण दूर होईल, अशी मागणी होत आहे.

ज्यांनी लोकशाहीची गळचेपी केली तेच लोकशाही वाचविण्याच्या घोषणा देत आहेत-सुजात आंबेडकरांची सरकारवर टीका



नांदेड (प्रतिनिधी)–ज्यांनी देशात लोकशाहीची गळचेपी केली, तेच आता लोकशाही वाचवण्याच्या घोषणा देत आहेत. भाजपचे 'लोकशाही बचाव' आंदोलन म्हणजे केएफसीने 'चिकन बचाव' आंदोलन काढण्यासारखे आहे. तुम्हीच लोकशाही हलाल करायला निघालात आणि आता तुम्हीच ती वाचवण्याचा आव आणत आहात, अशा बोचऱ्या शब्दांत वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. त्यांच्या या खोचक टीकेमुळे राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी राज्य सरकारच्या धोरणांवर सडकून टीका केली. मुदखेड तालुक्यातील माळकौठा येथील चंद्रकांत शिंदे यांच्या संशयास्पद मृत्यूपासून ते दुष्काळ, शेतकऱ्यांची कर्जकोंडी, खासगी फायनान्स कंपन्यांची वसुली, डेटा सेंटरसाठी पाण्याचा होणारा वापर आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न अशा अनेक मुद्द्यांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले.

माळकौठा येथील ४० वर्षीय चंद्रकांत शिंदे यांचा खासगी फायनान्स कंपनीच्या जाचामुळे मृत्यू झाल्याचा आरोप करत, वंचित बहुजन आघाडीने या घटनेला 'इन्स्टिट्यूशनल मर्डर' (संस्थात्मक हत्या) संबोधले. शिंदे कुटुंबीयांनी आधीच पोलिसांत बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवून अपहरणाची शक्यता व्यक्त केली होती; मात्र पोलिसांनी तातडीने पावले उचलली नाहीत, असा आरोप करण्यात आला. सरकार, राजकारणी, प्रशासन, पोलीस आणि फायनान्स कंपन्यांच्या साखळीमुळे (नेक्सस) सामान्य शेतकरी बळी पडत असल्याचे सांगत या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणी करण्यात आली.

राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना खासगी फायनान्स कंपन्यांची सक्तीची वसुली तात्काळ थांबवावी, अशी मागणी सुजात आंबेडकर यांनी केली. बँकांकडून वेळेवर कर्ज मिळत नसल्याने शेतकरी फायनान्स कंपन्यांच्या जाळ्यात अडकतात आणि अवाढव्य व्याजदरामुळे उद्ध्वस्त होतात. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, पुढील वर्षी मोफत बियाणे व चारा वाटप करावा, दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करावी आणि चारा छावण्या उभारण्यात याव्यात, अशा प्रमुख मागण्या त्यांनी लावून धरल्या.

यूजीसीचे अनुदान, बार्टी, सारथी, महाज्योती निधीतील कपात आणि फेलोशिपवरील निर्बंध यावरून केंद्र सरकारवर शिक्षणविरोधी धोरणाचा आरोप केला. बार्टीच्या विद्यार्थ्यांनी विखुरण्याऐवजी एकत्र येऊन लढा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

ज्ञानगंगा वृत्तपत्र विक्रेता स्वयंसहाय्यता बचत गटाचा स्तुत्य उपक्रम: नांदेडमध्ये दिवाळीनिमित्त राशन किटचे वाटप



नांदेड (प्रतिनिधी) –दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीच्या पवित्र सणानिमित्त 'ज्ञानगंगा वृत्तपत्र विक्रेता स्वयंसहाय्यता बचत गटा'च्या वतीने सभासद बांधवांना राशन व दिवाळी झ्ाराळाच्या साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम ३० ऑक्टोबर रोजी माता गुजरीजी विसावा उद्यान येथील वृत्तपत्र वितरण केंद्रावर पार पडला.

महाराष्ट्र वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या संकल्पनेतून या बचत गटाची स्थापना करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बचत गटाच्या वतीने दिवाळीनिमित्त विशेष किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये तांदूळ, सूर्यझ्ाुल तेल, साखर, जाडा पोहा, पतला पोहा, शेंगदाणे, डाळवा, बेसन पीठ, रवा, मैदा, चकली मसाला, चिवडा मसाला, मोती साबण आणि सुगंधी उटणे आदी गृहोपयोगी व फराळाच्या साहित्याचा समावेश आहे.

या कार्यक्रमास बचत गटाचे अध्यक्ष संदीप कटकमवार, सचिव भागवत गायकवाड, तसेच सदस्य चंद्रकांत घाटोळ, गणेश वडगांवकर, निळकंठ सोनटक्के, शशिकांत दामोदर, बालाजी चंदेल, सत्यनारायण आंधे, विठ्ठल झ्ाडेवार, दीपक नरवाडे आणि गणेश रत्नपारखे आदी उपस्थित होते.

वृत्तपत्र विक्रेत्यांच्या हितासोबतच सामाजिक बांधिलकी जोपासत बचत गटाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संकल्प; नांदेड जिल्ह्यात १ ते ७ नोव्हेंबरदरम्यान ब्रिक्स शाश्वत जीवनशैली सप्ताह

नागरिकांनी अभियानात सहभाग नोंदवावा-मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचे आवाहन

नांदेड(प्रतिनिधी)–पर्यावरणाचे संवर्धन, नैसर्गिक संसाधनांचा काटकसरीने वापर आणि स्वच्छतेच्या चळवळीत लोकसहभाग वाढविण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यात १ ते ७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'ब्रिक्स शाश्वत जीवनशैली सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहानिमित्त जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, युवक मंडळे, महिला मंडळे, बचत गट आणि विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून जनजागृतीपर तसेच कृतीशील उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

भारताच्या २०२६ मधील ब्रिक्स अध्यक्षपदाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या वतीने देशभरात या सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. 'मिशन लाईफ'च्या सात प्रमुख संकल्पनांवर आधारित या अभियानातून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रसार, नैसर्गिक संसाधनांचे जतन आणि नागरिकांच्या दैनंदिन सवयींमध्ये सकारात्मक बदल घडविण्यावर भर देण्यात येणार आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) च्या उद्दिष्टांशी सुसंगतपणे जिल्ह्यात एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळणे, ई-कचऱ्याचे प्रमाण कमी करणे आणि कचऱ्याची निर्मिती रोखणे यासाठी विशेष जनजागृती करण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ बाबत नागरिकांना माहिती देणे, घरगुती स्तरावर कचऱ्याचे चार प्रकारांत वर्गीकरण करण्यासाठी प्रबोधन करणे तसेच प्लास्टिक कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी वापर कमी करणे, पुनर्वापर आणि पुनर्चक्रण या त्रिसूत्रीचा प्रसार करण्यात येणार आहे.

यात्री निवास ते अबचलनगर जोडरस्त्याच्या कामाला सुरुवात; आ. आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते उद्घाटन



नांदेड (प्रतिनिधी) –शहरातील अबचलनगर ते यात्री निवास पोलीस चौकी या जोडरस्त्याच्या नुतनीकरणाच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते नारळ फोडून या काम ाचा शुभारंभ करण्यात आला. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या रस्ता दुरुस्तीच्या म ागणीला अखेर यश आले आहे.

म लनिस्सारण वाहिनीच्या काम ासाठी मे महिन्यात हा रस्ता खोदण्यात आला होता. त्यानंतर रस्ता उखडलेल्या अवस्थेतच राहिल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्यात रस्त्यावर घसरगुंडी निर्माण होऊन अनेकदा छोटे-मोठे अपघात झाले. त्यातच गिट्टी टाकण्यात आल्याने दुचाकींसह अन्य वाहनांच्या वाहतुकीतही अडथळे निर्माण होत होते. अनेक वेळा मोठी वाहनेही या रस्त्यावर अडकून पडली होती.

या परिस्थितीमुळे परिसरातील शीख बांधवांसह नागरिकांनी रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी स्वतः या विषयात लक्ष घातले. तसेच संबंधित विभाग आणि कंत्राटदाराला रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार अखेर कामाला सुरुवात झाली आहे.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, नगरसेवक गुरमितसिंघ नवाब, नगरसेवक धीरज यादव, शिवसेना सहसंपर्क प्रमुख दर्शनसिंघ सिद्धू, सहसंपर्कप्रमुख गुरमितसिंघ टमना, उपजिल्हाप्रमुख अवतारसिंघ पहेरेदार, गुरमीतसिंघ महाजन, रोशनसिंघ जहागीरदार, मनप्रीतसिंघ कुंजीवाले, महिंदरसिंघ लांगरी, तेजपालसिंघ खेड, गुरदीपसिंघ संधू, नानकसिंघ फौजी, तेजिंदरसिंघ ग्रंथी, जीतसिंघ दुकानदार, इंदरसिंघ सरदार, गुरुसिमरनसिंघ सरदार, अंगदसिंघ सिद्धू, सुदिन पाटील बागल, रवि थोरात यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. बोंढारकर म्हणाले की, उखडलेल्या रस्त्यामुळे या भागातील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. भविष्यात अशा अडचणी नागरिकांना भासू नयेत यासाठी प्रयत्न केले जातील. रस्त्याच्या कामाचा शुभारंभ झाला असून नियोजित वेळेत हे काम पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रगतीमंत्र

टोमण्यांना सुरभी गांधी यांनी यशातून दिले उत्तर, दररोज 14 तास केला अभ्यास!

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी जिद्द, कठोर परिश्रम आणि स्वतःवरील विश्वास या तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी ध्येय निश्चित असेल तर यश मिळवता येते, हे सनदी लेखापाल (सीए) सुरभी गांधी यांच्या प्रवासातून दिसून येते. एकेकाळी त्यांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्यांनी त्यांना सीए होण्याऐवजी चित्रकलेकडे वळण्याचा सल्ला दिला होता. मात्र, या टोमण्यांना त्यांनी खचून न जाता प्रेरणा मानले आणि कठोर मेहनतीच्या जोरावर सीए होण्याचे स्वप्न पूर्ण केले.



आज सुरभी गांधी या यशस्वी सनदी लेखापाल असून, पॉडकास्टर आणि आरोग्य व जीवनशैलीविषयक मार्गदर्शक म्हणूनही त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सुरभी यांचे म्हणणे आहे की, मनात जिद्द असेल तर ध्येय गाठणे अशक्य नाही. इतरांपेक्षा काहीतरी वेगळे आणि अधिक साध्य करायचे असेल, तर सामान्यांपेक्षा अधिक मेहनत करण्याची तयारी ठेवावी लागते. सुरभी गांधी या मुंबईतील मारवाडी जैन कुटुंबातील आहेत. लहानपणापासूनच त्यांचा स्वभाव काहीसा अंतर्मुख होता. इतर मुलांमध्ये मिसळण्यापेक्षा एकांतात वेळ घालवणे त्यांना अधिक आवडत असे. शालेय जीवनातही त्यांचे मित्रमैत्रिणी कमी होते. मात्र, याच एकटेपणाने त्यांना मानसिकदृष्ट्या अधिक खंबीर बनवले. समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी आणि आयुष्यात काहीतरी मोठे साध्य करावे, ही इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली.

मित्रांना पाहून निवडले सनदी लेखापाल होण्याचे क्षेत्र...

सुरभी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी कधीही त्या सनदी लेखापाल होतील, असा विचार केला नव्हता. बारावीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे कोणते क्षेत्र निवडावे, याबाबतही त्यांच्यासमोर स्पष्ट दिशा नव्हती. त्यावेळी त्यांचे अनेक मित्र सीए होण्याच्या दिशेने वाटचाल करत होते. मित्रांना पाहून सुरभी यांनीही याच क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला हा निर्णय फारसा ठाम नव्हता. मात्र, सीए फाउंडेशनची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांचा आत्मविश्वास वाढू लागला. त्यांनी आपल्या यशस्वी प्रवासाची माहिती स्वतःच्या यूट्यूब चॅनेलवरही शेअर केली आहे.

नातेवाइकाचा टोमणा ठरला प्रेरणादायी

सीए अभ्यासक्रमाचा प्रवास सुरू असतानाच सुरभी यांना अनेकदा त्यांच्या क्षमतेबाबत प्रश्नांचा सामना करावा लागला. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले की, एकदा एका नातेवाइकाने त्यांना, 'तू नेहमी फॅशनमध्येच रमतेस. सीएचा अभ्यास सोडून चित्रकला किंवा रंगकाम कर. तुझ्याकडून सीए होणार नाही,' असा टोमणा मारला होता. या वक्तव्यामुळे सुरभी यांच्या मनाला वेदना झाल्या. मात्र, त्यांनी या टीकेमुळे आपले ध्येय बदलले नाही. उलट, स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची जिद्द त्यांच्या मनात अधिक प्रबळ झाली. इतरांनी केलेल्या टीकेला कमजोरी न मानता त्यांनी त्याचे रूपांतर प्रेरणेत केले. सीए इंटरमिजिएटचा टप्पा सुरभी यांच्यासाठी सर्वाधिक आव्हानात्मक ठरला. दिवसभराचे दीर्घ वर्ग, अभ्यासाचा मोठा व्याप आणि विषयांची कठीण पातळी यामुळे त्यांच्यावर मानसिक ताण वाढू लागला. वर्गातील इतर विद्यार्थी सहजपणे प्रश्न सोडवताना दिसत असत, तेव्हा आपल्याला हे जमेल का, असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होत असे. आपण चुकीचे क्षेत्र निवडले आहे का, असा विचारही त्यांना सतावत होता. पहिल्या प्रयत्नात सीए इंटरमिजिएट परीक्षेत त्यांना अपयश आले. हे त्यांच्या आयुष्यातील पहिले मोठे अपयश होते. त्यांच्या कुटुंबीयांनाही या निकालाचा धक्का बसला. मात्र, सुरभी यांना आपल्या तयारीतील कमतरतेची जाणीव झाली होती. त्यांनी निराश होऊन माघार घेण्याऐवजी नव्या जोमाने अभ्यास करण्याचा निर्णय घेतला.

खोलीतून पलंगही हटवला!

सीए होण्याचा निर्धार केल्यानंतर सुरभी यांनी अभ्यासासाठी कठोर दिनक्रम आखला. सलग तीन महिने त्यांनी स्वतःला अभ्यासासाठी पूर्णपणे वाहून घेतले. अभ्यासात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी त्यांनी काही महत्त्वाचे बदल केले. मोबाईल आणि समाजमाध्यमांपासून पूर्णपणे दूर राहण्याचा निर्णय घेतला. अभ्यास करताना झोप येऊ नये, यासाठी त्यांनी आपल्या खोलीतील पलंगही बाहेर काढून टाकला. दररोज पहाटे चार वाजता उठून अभ्यासाला सुरुवात केली. कोणत्याही खासगी शिकवणीशिवाय दररोज तब्बल १४ तास अभ्यास केला. सलग तीन महिने कठोर शिस्त आणि नियोजनाचे पालन केले. या काळात त्यांनी आपले संपूर्ण लक्ष परीक्षेच्या तयारीवर केंद्रित केले.

सीए इंटरमिजिएटचे दोन्ही गट एकाच वेळी उत्तीर्ण

सुरभी यांच्या अथक मेहनतीला अखेर यश आले. २०२२ मध्ये त्यांनी सीए इंटरमिजिएट परीक्षेचे दोन्ही गट एकाच वेळी उत्तीर्ण केले. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीयांनाही मोठा आनंद झाला. सीएची पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी अर्थविषयक क्षेत्रासोबतच आरोग्य आणि जीवनशैलीविषयक क्षेत्रातही काम सुरू केले. त्या 'प्रो-फिरो'च्या संस्थापक बनल्या. तसेच एक लाखांहून अधिक इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन केल्याचा उल्लेखही त्यांच्या प्रवासात करण्यात आला आहे. आज त्या सनदी लेखापाल, पॉडकास्टर आणि वेलनेस कोच म्हणून कार्यरत आहेत.

स्वत:वर विश्वास ठेवा, टीकेला घाबरू नका!

सुरभी गांधी यांचा प्रवास केवळ शैक्षणिक यशाची कहाणी नाही, तर अपयश, मानसिक तणाव, नकारात्मक टीका आणि आत्मविश्वासाच्या अभावावर मात करण्याची प्रेरणादायी कहाणी आहे. त्यांचा तरुणांना संदेश स्पष्ट आहे. इतर लोक काय बोलतात, यापेक्षा आपण स्वतःबद्दल काय विचार करतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. कोणाच्याही टीकेला घाबरू नका. स्वतःच्या निर्णयावर विश्वास ठेवा आणि ध्येय साध्य करण्यासाठी प्रामाणिकपणे मेहनत करा. कारण मनात ठाम जिद्द असेल, तर अडचणींवर मात करून यशाचे शिखर गाठता येते.



एमबीबीएस, बीडीएस प्रवेशाची अखेरची संधी!

नीट यूजी समुपदेशनाच्या विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर



वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. वैद्यकीय समुपदेशन समितीने (MCC) नीट यूजी २०२६ अंतर्गत विशेष रिक्त जागा प्रवेश फेरीचे (Special Stray Vacancy Round) वेळापत्रक जाहीर केले आहे. या फेरीच्या माध्यमातून एमबीबीएस, बीडीएस आणि बीएससी नर्सिंग अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. या विशेष फेरीमुळे आतापर्यंत वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांना आणखी एक संधी उपलब्ध होणार आहे. इच्छुक उमेदवारांना एमसीसीच्या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन नोंदणी करता येईल. यापूर्वी नोंदणी केलेल्या, मात्र अद्याप जागा न मिळालेल्या उमेदवारांना पुन्हा नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. ते थेट महाविद्यालय आणि अभ्यासक्रमांचे पसंतीक्रम भरू शकतात.

रिक्त जागा भरण्यासाठी विशेष फेरी

एमसीसीने अखिल भारतीय कोट्यांतर्गत (AIQ) ही विशेष समुपदेशन फेरी आयोजित केली आहे. पहिली, दुसरी, तिसरी आणि नियमित रिक्त जागा प्रवेश फेरी पूर्ण झाल्यानंतरही काही जागा रिक्त राहिल्या आहेत. प्रवेश मिळूनही काही विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला नाही किंवा निर्धारित वेळेत प्रवेशासाठी हजेरी लावली नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या रिक्त जागा भरण्यासाठी विशेष फेरी घेण्याचा निर्णय एमसीसीने घेतला आहे.

2 नोव्हेंबरपासून नोंदणी प्रक्रिया



एमसीसीने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार विशेष रिक्त जागा प्रवेश फेरीसाठी २ नोव्हेंबर २०२६ पासून ऑनलाइन नोंदणी सुरू होणार आहे. ही प्रक्रिया ४ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत सुरू राहील. महाविद्यालय आणि अभ्यासक्रमांचे पसंतीक्रम भरण्याची प्रक्रिया २ नोव्हेंबरपासून सुरू होऊन ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. यापूर्वी एमसीसीच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या, मात्र कोणतीही जागा न मिळालेल्या उमेदवारांना पुन्हा नोंदणी करावी लागणार नाही. ते थेट पसंतीक्रम भरण्याच्या प्रक्रियेत सहभागी होऊ शकतील.

5 नोव्हेंबरपर्यंत पसंतीक्रम निश्चित करण्याची मुदत

महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरल्यानंतर ते निश्चित (Choice Locking) करण्याची प्रक्रिया ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता सुरू होईल. ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना पसंतीक्रम निश्चित करता येतील. विद्यार्थ्यांनी निर्धारित वेळेत आपल्या पसंतीच्या महाविद्यालयांची आणि अभ्यासक्रमांची निवड निश्चित करणे आवश्यक आहे. अंतिम मुदतीपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करावी.

प्रवेश प्रक्रियेचा टप्पा	तारीख आणि वेळ
ऑनलाइन नोंदणी सुरू	२ नोव्हेंबर २०२६
नोंदणीची अंतिम मुदत	४ नोव्हेंबर, दुपारी ३ वाजेपर्यंत
पसंतीक्रम भरण्यास सुरुवात	२ नोव्हेंबर २०२६
पसंतीक्रम भरण्याची अंतिम मुदत	५ नोव्हेंबर, सकाळी ११ वाजेपर्यंत
पसंतीक्रम निश्चित करणे सुरू	४ नोव्हेंबर, सायंकाळी ४ वाजता
पसंतीक्रम निश्चित करण्याची अंतिम मुदत	५ नोव्हेंबर, सकाळी ११ वाजेपर्यंत
तात्पुरता जागावाटप निकाल	७ नोव्हेंबर २०२६
महाविद्यालयात प्रवेशासाठी हजेरी	७ ते १६ नोव्हेंबर २०२६



अधिकृत संकेतस्थळ : https://mcc.nic.in/

7 नोव्हेंबरला जागावाटपाचा निकाल

एमसीसीच्या वेळापत्रकानुसार विशेष रिक्त जागा प्रवेश फेरीचा तात्पुरता जागावाटप निकाल (Provisional Seat Allotment Result) ७ नोव्हेंबर २०२६ रोजी जाहीर केला जाणार आहे. या फेरीत प्रवेशासाठी जागा मिळालेल्या विद्यार्थ्यांना ७ ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत संबंधित वैद्यकीय, दंत किंवा नर्सिंग महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. या वेळी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे निर्धारित शुल्क भरावे लागेल. तसेच प्रवेशासाठी आवश्यक असलेली सर्व मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करावी लागतील.

पसंतीक्रम भरताना घाई करू नका; तज्ज्ञांचा सल्ला

या विशेष फेरीत महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरताना विद्यार्थ्यांनी विशेष काळजी घ्यावी, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. ज्या महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यास प्रत्यक्ष प्रवेश घेण्याची तयारी आहे, अशाच महाविद्यालयांचा समावेश पसंतीक्रम यादीत करावा. केवळ पर्याय वाढविण्यासाठी किंवा कोणत्याही विचाराशिवाय महाविद्यालयांची निवड करू नये. ज्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याची इच्छा नाही, अशा महाविद्यालयांचा पर्याय यादीत समाविष्ट करणे टाळावे. जागावाटप झाल्यानंतर निर्धारित मुदतीत संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

चालू महिन्यात सरकारी नोकऱ्यांची मोठी संधी!

अर्ज करण्याची मुदत याच महिन्यात संपणार

सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी नोव्हेंबर महिना महत्त्वाचा ठरणार आहे. रेल्वे, केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध विभागांमध्ये भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, यातील बहुतांश भरतींसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत नोव्हेंबर महिन्यातच संपणार आहे. त्यामुळे पात्र उमेदवारांनी संधीचे सोने करत मुदतीपूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.



भरतींची माहिती...

» खादी सुधारणा व विकास कार्यक्रम : केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग मंत्रालयांतर्गत खादी सुधारणा व विकास कार्यक्रमासाठी (KRDP) मोठी भरती जाहीर करण्यात आली आहे. खादी विकास अधिकारी, खादी निरीक्षक, लेखा अधिकारी, तांत्रिक अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी, कनिष्ठ सहायक, निम्नश्रेणी लिपिक, वाहनचालक आणि बहुउद्देशीय कर्मचारी अशा विविध पदांवर नियुक्त्या करण्यात येणार आहेत. दहावी, बारावी उत्तीर्ण तसेच पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार अर्ज करता येईल.
एकूण पदे : १२,८७८
अर्ज संकेतस्थळ : krdp.org.in
अर्जाची अंतिम मुदत : पहिला टप्पा २५ नोव्हेंबर आणि दुसरा टप्पा ३० नोव्हेंबर २०२६.

» ओएनजीसी अप्रेंटिस भरती : ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन अर्थात ओएनजीसीने (ONGC) देशभरातील २४ कार्यकेंद्रांमध्ये शिकाऊ उमेदवारांची भरती जाहीर केली आहे. दहावी, बारावी उत्तीर्ण, आयटीआय, बीबीए, पदवीधर, पदविकाधारक तसेच अभियांत्रिकी पदवी आणि पदविकाधारक उमेदवारांना या भरतीसाठी अर्ज करता येणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना १२ महिन्यांचे प्रशिक्षण दिले जाईल. या प्रशिक्षण कालावधीत पदानुसार दरमहा ८,२०० ते १२,३०० रुपये विद्यावेतन मिळणार आहे.
एकूण पदे : ३,०४७
अर्ज संकेतस्थळ : ongcindia.com
अर्जाची अंतिम मुदत : २० नोव्हेंबर २०२६

» रेल्वे एनटीपीसी पदवीधर भरती : रेल्वेच्या बिगर तांत्रिक लोकप्रिय संवर्गातील (NTPC) पदवीधर पदांसाठीही अर्ज प्रक्रिया सुरू आहे. मुख्य वाणिज्य तिकीट पर्यवेक्षक, मालगाडी व्यवस्थापक, कनिष्ठ लेखा सहायक-सह-टंकलेखक आणि वरिष्ठ लिपिक-सह-टंकलेखक अशा पदांवर नियुक्त्या केल्या जाणार आहेत. या भरतीसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आवश्यक आहे. उमेदवारांचे वय १८ ते ३३ वर्षांदरम्यान असावे.
एकूण पदे : ३,५४८
अर्ज संकेतस्थळ : www.rrbapply.gov.in
अर्जाची अंतिम मुदत : ८ नोव्हेंबर २०२६.

» रेल्वे स्टेशन मास्तर : रेल्वे भरती मंडळाकडून (RRB) स्टेशन मास्तर पदासाठी स्वतंत्र भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असलेले उमेदवार या भरतीसाठी अर्ज करू शकतात. उमेदवारांचे वय २० ते ३३ वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना नियमानुसार वयोमर्यादेत सवलत दिली जाणार आहे.
एकूण पदे : १,२६५
अर्ज संकेतस्थळ : www.rrbapply.gov.in
अर्जाची अंतिम मुदत : २७ नोव्हेंबर २०२६

» रेल्वे एनटीपीसी बारावी उत्तीर्ण उमेदवारांसाठी भरती : रेल्वेच्या एनटीपीसी पदवीधर भरतीसोबतच बारावी उत्तीर्ण उमेदवारांसाठीही भरती प्रक्रिया सुरू आहे. वाणिज्य-सह-तिकीट लिपिक, लेखा लिपिक-सह-टंकलेखक, कनिष्ठ लिपिक-सह-टंकलेखक आणि रेल्वे लिपिक अशा पदांचा यामध्ये समावेश आहे. या भरतीसाठी बारावी उत्तीर्ण उमेदवार अर्ज करू शकतात. निवड प्रक्रिया संगणक आधारित परीक्षा (CBT-1 आणि CBT-2), कागदपत्र पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी अशा टप्प्यांत पार पडणार आहे.
एकूण पदे : १,६८८
अर्ज संकेतस्थळ : www.rrbapply.gov.in
अर्जाची अंतिम मुदत : १३ नोव्हेंबर २०२६

अर्ज करण्यापूर्वी...

सरकारी नोकरीसाठी अर्ज करताना उमेदवारांनी संबंधित भरतीची अधिकृत जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, आरक्षण, अर्ज शुल्क आणि निवड प्रक्रियेची माहिती तपासल्यानंतरच अर्ज करावा. अंतिम मुदतीच्या शेवटच्या दिवसाची वाट न पाहता शक्य तितक्या लवकर अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी.

मालेगावात ट्रॅक्टर-मोटारसायकलची धडक; बालिकेचा मृत्यू तर तीनजण गंभीर जखमी



अर्धापूर (प्रतिनिधी)– तालुक्यातील मालेगाव येथील पोलीस चौकीच्या जवळील ऊसाच्या ट्रॅक्टर-दुचाकीचा अपघात रविवार, दि.१ नोव्हेंबर रोजी झाला. या अपघातात एका बालिकेचा मृत्यू झाला तर ३ जण गंभीर जखमी आहेत.

ट्रॅक्टर-दुचाकीच्या अपघाताची माहिती पोलिसांनी दिली. कार्यक्रमासाठी दुचाकीने जात असताना मालेगाव येथील पेट्रोल पंपासमोर व पोलीस चौकीजवळ ट्रॅक्टर व दुचाकी अपघात झाला. दुचाकीवरील ज्ञानेश्वर मुंजाजी नादरे (वय २७ वर्षे), अंकिता ज्ञानेश्वर नादरे (वय २२ वर्षे), संस्कृती संभाजी नादरे (वय १० वर्षे) स्वरा संभाजी नादरे (वय ८ वर्षे) सर्व रा. माळवटा ता.वसमत जि. हिंगोली हे या अपघातात गंभीर जखमी झाले.

या अपघाताची माहिती मिळताच १०८ रुग्णवाहिकेतून जखमींना नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना स्वरा संभाजी नादरे या बालिकेचा या अपघातात मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी सहायक पोलीस निरीक्षक भास्कर कांबळे, सुभाष मुंगल, ज्ञानेश्वर भिसे या जखमींना रुग्णालयात पाठविले.

या अपघातातील जखमींवर नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

लोह्यात इंदिरानगर येथे वानराच्या टोळ्याचा धुमाकूळ; नागरिक भयभीत

- वनविभाग व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष
- अन्नधान्य व पाईपलानचे नुकसान


लोहा (प्रतिनिधी)– लोहा शहरातील इंदिरानगर येथे वानराच्या टोळ्यांनी मोठा धुमाकूळ घातला असून, यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. वनविभाग व लोकप्रतिनिधीचे या प्रकरणी लक्ष नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, याकडे वरिष्ठांनी तत्काळ लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

लोहा शहरातील इंदिरानगर ही वस्ती गोरगरीब सामान्य माणसाची वस्ती आहे. येथे काही घरे सिमेंटचे तर काही पत्र्याचे आहेत. या घरांवर वानरांच्या अनेक टोळ्या उड्या मारीत आहेत. पाण्याच्या टाक्या तसेच पाईप लाईन, वाळू घातलेले अन्नधान्य यांचे प्रचंड नुकसान वानराच्या टोळ्या करीत आहेत.

तसेच अनेक वानरे हे अनेकांच्या अंगणात धुमाकुळ घालून सर्वत्र घाण करीत आहेत. या वानरांनी घरांवर उड्या मारल्यामुळे घरावरच्या दगड वीटा पडत आहेत. त्यामुळे नागरिकांना दुखापत होण्याची शक्यता आहे. काही माणसे या वानरांना हुसकावण्याचा प्रयत्न करीत असल्याने ही वानरे माणसाच्या अंगावर जात आहेत. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. तेव्हा याकडे वनविभागाच्या वरिष्ठांनी तात्काळ लक्ष देऊन या वानरांच्या टोळ्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

मनोज जरांगे पाटील आज नांदेडमध्ये

स्व. गणपतराव वडजे पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त कीर्तन सोहळ्यास उपस्थिती



नांदेड (प्रतिनिधी)– मराठा आरक्षणाच्या लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील हे सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. मराठा सेवक श्याम पाटील वडजे यांचे वडील स्व. गणपतराव वडजे पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यास मनोज जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

स्वर्गीय गणपतराव वडजे पाटील यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी श्याम पाटील वडजे परिवाराच्या वतीने या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, सोमवार, दिनांक २ नोव्हेंबर रोजी गुंडेगावकर मंगल कार्यालय, उस्माननगर रोड, नांदेड येथे सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचे कीर्तन होणार आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे.

या सोहळ्यास नांदेड जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, वैद्यकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक व विधी क्षेत्रातील मान्यवर, विविध सामाजिक चळवळींतील कार्यकर्ते, मराठा आरक्षण आंदोलनातील सहकारी, मनोज जरांगे पाटील यांचे समर्थक, मराठा समाजबांधव तसेच वडजे परिवाराचे नातेवाईक, आप्तेष्ट आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वडजे परिवारातील सदस्य, समस्त गावकरी आणि मित्रपरिवार परिश्रम घेत आहे, अशी माहिती कार्यक्रमाच्या संयोजिका सौ. सुचिता जोगदंड-वडजे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

या कीर्तन सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहनही संयोजकांनी एका पत्रकान्वये केले आहे.

खातेदारांच्या संमतीविना बँक खात्यांवर सायबर चोरट्यांचा डल्ला

नायगाव-मुखेडमध्ये दोन खात्यांतून लाखोंची रक्कम परस्पर वळती; पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यालाही फटका

नायगाव (प्रतिनिधी)– बँक खात्यातील ठेवी सुरक्षित असल्याचा विश्वास असलेल्या खातेदारांनाच सायबर चोरट्यांनी लक्ष्य केल्याचे नायगाव आणि मुखेड येथील दोन घटनांमधून समोर आले आहे. खातेदारांनी कोणताही आर्थिक व्यवहार केलेला नसताना त्यांच्या बँक खात्यांतून परस्पर लाखो रुपयांची रक्कम वळती करण्यात आली. यामध्ये नायगाव पंचायत समितीतील विस्तार अधिकाऱ्याच्या खात्यातून १ लाख ४२ हजार ६९६ रुपये गायब झाल्याने बँकिंग व्यवहारांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मुखेड तालुक्यातील सलगरा बुद्रुक येथील रहिवासी तथा नायगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रकाश श्रीहरी जाधव यांचे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मुखेड शाखेत खाते आहे. दि. २८ ऑक्टोबर रोजी त्यांनी कोणताही व्यवहार केलेला नसताना त्यांच्या खात्यातून १ लाख ४२ हजार ६९६ रुपये परस्पर काढण्यात आल्याचे निदर्शनास आले. धनादेश, फोन पे, आरटीजीएस किंवा रोख रक्कम काढण्यासारखा कोणताही व्यवहार आपण केला नसल्याचे जाधव यांनी स्पष्ट केले. याप्रकरणी त्यांनी बँक शाखा व्यवस्थापकांकडे लेखी तक्रार देऊन व्यवहारांची चौकशी करून रक्कम परत मिळवून देण्याची मागणी केली आहे.

असाच प्रकार नायगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडिया, हेडगेवार चौक शाखेतही घडल्याचे समोर आले आहे. दि. २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातनंतर खातेदाराच्या संमतीशिवाय वेगवेगळ्या टप्प्यांत खात्यातील रक्कम वळती करण्यात आली. विशेष म्हणजे, फोन पे, गुगल पे, एटीएम, आरटीजीएस किंवा धनादेशाद्वारे कोणताही व्यवहार केला नसल्याचे तसेच कोणालाही ओटीपी अथवा पिन क्रमांक दिला नसल्याचे संबंधित खातेदाराने तक्रारीत नमूद केले आहे.

एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या बँकांच्या शाखांमधील खात्यांतून परस्पर रक्कम वळती झाल्याने खातेदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. कोणताही व्यवहार न करता खात्यातील पैसे गायब होत असतील तर बँकिंग यंत्रणेतील सुरक्षा व्यवस्थेचे नेमके काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित व्यवहार कोणत्या माध्यमातून झाले, पैसे कोणत्या खात्यात जमा झाले आणि या प्रकरणामागे सायबर फसवणुकीचे नेमके कोणते तंत्र वापरण्यात आले, याचा शोध घेणे आवश्यक आहे.

अर्धापूर व देगलूरमध्ये जुगार अड्ड्यांवर धाड; १६ जणांवर गुन्हे, २.५४ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेंतर्गत नांदेड पोलिसांनी दोन मोठ्या कारवाया करत तिर्रट जुगार अड्ड्यांवर धाडी टाकल्या आहेत. या कारवाईत अर्धापूर आणि देगलूर येथे एकूण १६ इसमांविरुद्ध गुन्हे दाखल करून २ लाख ५४ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. ३१ ऑक्टोबर रोजी पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने छापा टाकला असता राजरत्न केरबा सोनटक्के (वय २३), श्रीरत्न सुभाष वाघमारे (वय २२), गौतम गंगाराम प्रधान (वय ३६) हे जागीच मिळून आले, तर संतोष सरोदे, संतोष गायकवाड, बालाजी कांबळे, शुभम सरोदे, अक्षय इंगोले, प्रफुल्ल गोडबोले (सर्व रा. सावतामाळी नगर/आंबेडकर नगर, अर्धापूर) हे पळून गेले.

पोलिसांनी घटनास्थळावरून २ मोटारसायकली (MH-२६-CS-८६८८ सह एक विना नंबरची), रोख १ हजार १५० रुपये व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ४१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलीस ठाणे अर्धापूर येथे गु.र.नं. ५९४/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देगलूर उपविभागीय पथकाची कारवाई – ७ जणांवर गुन्हा, १.१३ लाख जप्त

दुसरी कारवाई दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी देगलूर, किरण पोपळघट यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून करण्यात आली. गंगासागर बारच्या बाजूच्या मोकळ्या जागेत, देगलूर येथे तिर्रट जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच पथकाने धाड टाकली.

यात माधव गंगाराम कोकणे (वय ३६, करडखेड), वीरभद्र शंकरराव मोघे (वय २८, सांगवी), महेंद्र दत्तात्रय कुलकर्णी (वय ३६), रामा हानमंत दरगलवार (वय ४०), बसवंत मारोती मुंगडे (वय ३१), ईश्वर आनंदराव पाटील (वय ३६, केदारकुंठा), विठ्ठल ईरन्ना गडपवार (वय ५१, दरेगाव) हे सातही जण जुगार खेळताना आढळले. त्यांच्याकडून ७ मोबाईल फोन (अं. किंमत ९३ हजार ७८० रुपये), रोख १९ हजार २२० रुपये व जुगार साहित्य असा एकूण १ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस ठाणे देगलूर येथे गु.र.नं. ५२६/२०२६ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

पान १ वरून...

दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती....

माध्यमातून ६०० कोटी रुपये खर्चून ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय उभारले जात आहे. वाडी येथील १०० खाटांमुळे आता नांदेडमध्ये जवळपास १७०० ते १८०० रुग्ण दाखल करण्याची क्षमता निर्माण झाली आहे. आयुष्यमान कार्डची अट न ठेवता सर्वांना मोफत आरोग्य सेवा आणि कॅन्सर सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरू करावे.आमदार हेमंत पाटील म्हणाले, उद्घाटनापूर्वी अनेक अडचणी आल्या. पण रात्रीतून भूमिपूजन कोणीही केले तरी या इमारतीला निधी एकनाथ शिंदे साहेबांनी दिला आहे. या ठिकाणी नातेवाईकांसाठी धर्मशाळा, कॅन्टीन, ऑक्सिजन प्लांट, डायलिसिस, सिटीस्कॅन सुविधा आणि पूर्ण कर्मचारी वर्ग द्यावा. खाजगी फायनान्सवाल्यांच्या मुसक्या आवळाव्यात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरोग्य विभागाचे अधिकारी यांनी केले. आयोजक आमदार बालाजीराव कल्याणकर म्हणाले, आजपासून खऱ्या अर्थाने या रुग्णालयाची सेवा सुरू झाली आहे, हीच माझ्या कामाची पावती आहे. या कार्यक्रमात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना धनादेश, माळकोठा येथील मयत चंद्रकांत शिंदे यांच्या कुटुंबियांना शिवसेनेतर्फे ५ लाखांची मदत, तर कासारखेडा येथील राम शिंदे आणि बोरगाव येथील शंकर क्षीरसागर यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १ लाख रुपयांची मदत देण्यात आली. तसेच एकल महिलांना शिलाई मशीन, विद्यार्थिनींना सायकल, टँकर आणि चारा वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'आरोग्य सेवेचे नवे पर्व' ही डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, विनय गिरडे पाटील, गणेश कदम मरळकर, दौलतराव पोपळे, मारुती पावडे, शिवाजी इंगोले, श्याम पाटील कोकाटे, पिंटू कदम, सचिन पोपळे, मंगेश कदम, नगरसेवक संदीप गाडीवाले, नारायण कदम यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Change In Name

My old name is SAHARA BEGUM which is now i am changing New name SAYERA BEGUM HAJI MOHAMMED GOUS hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name. Address :- 1-1-134 RAILWAY STATION ROAD, MUDKHED, Nanded, 431806 Mobile No 9607792246



टी.सी. हरवली

माझी सौज्ञफुला सिताराम जाधव रा. निळेगव्हान ता.नायगाव जि.नांदेड या नावाची ८ वी पासची टी.सी. कुष्णूर ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

संपर्क पत्ता – सौज्ञफुला सिताराम जाधव रा. निळेगव्हान ता.नायगाव खै जि. नांदेड

Change In Name

My old Name is **NAUSHEEN KHANAM SAKIL AHMED KHAN** Which now I am Changing as New Name **NAUSHEEN FATEMA SYYED AJAZ ALI** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: HOUSE NO 7-2-28 NEAR MAKKA MASJID ITWARA CHOWK BAZAR NANDED - 431604

Change In Name

I WANT TO CHANGE MY NAME IN MY OLD PASSPORT NO. A1464287

OLD NAME: SAYED AMJED ALI SAYED AJAZ

NEW NAME: SYED AIJAZ ALI

ADDRESS: HOUSE NO 7-2-28 NEAR MAKKA MASJID ITWARA CHOWK BAZAR NANDED - 431604

Change In Name

I SYED AIJAZ ALI WANT TO CHANGE MY SON'S NAME IN HIS

OLD NAME : SYED SUFIYAN ALI

NEW NAME : SYYED SUFIYAN ALI

ADDRESS : HOUSE NO 7-2-28 NEAR MAKKA MASJID ITWARA CHOWK BAZAR NANDED - 431604

Change In Name

My old name is MD GOUS which is now i am changing New name MOHAMMED GOUS ABDUL SATTAR hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.

Address :- 1-1-133 MADINA NAGAR NEAR RAILWAY STATION, MUDKHED, Nanded, 431806

जाहीर प्रगटन

मौजे वजिराबाद ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील सोमेश कॉलनी कलामंदिन येथील सिटी सर्व्हे नं. ३६४४ पैकी मोकळी जागा ज्याची लांबी दक्षिण-उत्तर : १२.०० मीटर व रूंदी पूर्व-पश्चिम : ४.१७ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ ५.०४ चौ.मीटर जागा लक्ष्मीबाई माधवराव इंगळे रा. सोमेश कॉलनी नांदेड यांचेकडून माधव विश्वनाथ कंधारे रा. बोरगाव तेलंग ता.जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

जागेची चतु:सिमा- पूर्वेस - मनीष बालाप्रसाद दाढ व आशिष बालाप्रसाद दाढ यांची मिळकत, पश्चिमेस - बालाजी माधव इंगळे यांची मिळकत, दक्षिणेस - निवृत्ती उकाजी सदावर्ते यांचे घर व उत्तरेस - रस्ता.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील मोकळ्या जागेबद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत माधव विश्वनाथ कंधारे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
माधव विश्वनाथ कंधारे
रा. बोरगाव तेलंग ता.जि. नांदेड

जाहीरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४४/२०२६

अर्जदार : ०१. चंद्राबाई भ्र. देवराव पिंगळे , वय – ७५ वर्षे, धंदा –घरकाम,
०२. माधव पि.देवराव पिंगळे , वय – २८ वर्षे, धंदा – शेती ,
०३. आनंदा पि.देवराव पिंगळे , वय – २५ वर्षे, धंदा – शेती ,
०४. कृष्णा पि. देवराव पिंगळे , वय – १५ (अज्ञान)
सर्व रा. चिरली ता.बिलोली जि. नांदेड

पुढील तारीख – २५.११.२०२६

विरुध्द.

गैरअर्जदार: निरंक .

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदाराचे असे कथन आहे की, **मयत देवराव पि.लक्ष्मण पिंगळे** यांचे कायदेशीर वारस आहेत. **मयत देवराव पि.लक्ष्मण पिंगळे यांचे अर्जदार क्र १ ही त्यांची पत्नी असून अर्जदार क्र २ ते ४ हे त्यांचे अपत्ये आहेत. मयत देवराव पि.लक्ष्मण पिंगळे यांचा मृत्यू दिनांक ०१/०५/२०१९ रोजी चिरली ता.बिलोली. जि. नांदेड येथे झाला.** अर्जदार हयांना **मयत देवराव पि.लक्ष्मण पिंगळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत देवराव पि.लक्ष्मण पिंगळे** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत देवराव पि.लक्ष्मण पिंगळे** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत देवराव पि.लक्ष्मण पिंगळे** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३०' दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत देवराव पि.लक्ष्मण पिंगळे** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयत **देवराव पि.लक्ष्मण पिंगळे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/ १० /२०२६ माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर,
बिलोली

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छ.संभाजीनगर
कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 8 नांदेड
ई – मेल eeuppdivn8@gmail.com

ई-निविदा सुचना क्र. 01 सन 2026-27 - द्वितीय वेळ

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.8, नांदेड जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

अ.क्र	कामाचे नांव	जिल्हा	निविदेची किंमत GST वगळून	ई निविदा उपलब्ध कालावधी	ई निविदा उघडण्याचा दिनांक
01	करखेली शाखा कालव्यावरील उजवी वितरिका क्र.1 सा.क्र.2520 मी व उजवी वितरीका क्र.2 सा क्र. 2860 मी व त्यावरील वितरण व्यवस्थेचे अस्तरीकरणाचे काम ,करखेली शाखा कालव्यावरील डावा लघु कालवा क्र.1 ते 4 , उजवा लघु कालवा क्र.1 ते 4 व अंत्य लघु कालव्यावरील वितरण व्यवस्थेचे अस्तरीकरणाचे काम.	नांदेड	1639.95 लक्ष	दि.02/11/2026 ते दि.13/11/2026	दि.16/11/2026

खालील ठिकाणी ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. संकेत स्थळ https://mahatenders.gov.in
   (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
2. कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.8 नांदेड यांच्या कार्यालयातील सुचना फलक

जा.क्र. उपेप्रवि क्र.8/ लेखा-1/ 2035 दि.29/10/2026

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.8, नांदेड

कार्यकारी अभियंता,
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.8, नांदेड

गोदातीर समाचार

सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ पान ६

'अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम-४' अंतर्गत १४०२ गुन्हे दाखल, ४० कोटींचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– परिक्षेत्रात अवैध व्यवसायांच्या विरोधात राबवण्यात आलेल्या 'अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम-४' ला मोठे यश मिळाले आहे. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या महिनाभरात राबवलेल्या या मोहिमेत एकूण १४०२ गुन्हे दाखल करून १९५५ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून तब्बल ४० कोटी ६९ हजार ३३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या मोहिमेंतर्गत गुटखा विक्री विरोधात भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये २३ गुन्हे, महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत २३७ गुन्हे, महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ८५८ गुन्हे, शस्त्र अधिनियमान्वये ३७ गुन्हे आणि इतर अधिनियमांखाली २४७ अशा कारवाया करण्यात आल्या आहेत. या मोहिमेत नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या चारही जिल्ह्यांतील जिल्हा पोलीस दलासह पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने सहभाग घेतला. विशेष पथकाने अवैध वाळू, मटका, जुगार आणि गुटखा विरोधात स्वतंत्र कारवाया केल्या आहेत.

दिनांक १ नोव्हेंबरपासून परिक्षेत्रात 'अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम-५' सुरू करण्यात येणार आहे. या मोहिमेत गुटखा, मटका-जुगार, अवैध दारू, अंमली पदार्थ, अवैध वाळू उपसा व वाहतूक, वेश्या व्यवसाय, जीवनावश्यक वस्तू अधिनियम, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींविरुद्ध अधिक कठोर कारवाई केली जाणार आहे. याबाबत सर्व जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचवण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने 'खबर' हेल्पलाइन (मो. क्र. ९१ ५० १०० १००) सुरू केली आहे. आपल्या परिसरातील अवैध धंद्यांची माहिती या क्रमांकावर देऊन नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

खांबेगाव बसस्थानकावर टेम्पोखाली चिरडून खून; दोघांवर गुन्हा दाखल

आधीच्या भांडणाचा राग मनात धरून दोघा भावांनी संगनमताने घडवला रक्तरंजित प्रकार

लोहा (प्रतिनिधी)– गावातील जागेच्या वादातून निर्माण झालेल्या जुन्या वैमनस्याचे पर्यवसान अखेर एका भीषण हत्याकांडात झाले. खांबेगाव येथील रहिवासी अरुण भाऊराव कुंटे (वय ५०) यांना पालम-लोहा रोडवरील खांबेगाव बसस्थानकाजवळ भरधाव टेम्पोने जोरदार धडक देऊन चिरडल्याची धक्कादायक घटना रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.५० वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत अरुण कुंटे यांचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे, टेम्पोखाली अडकलेल्या अरुण यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू असतानाही चालकाने वाहन मागे घेऊन पुन्हा त्यांच्या अंगावर घातल्याचा गंभीर आरोप पत्नी मंगलबाई कुंटे यांनी फिर्यादीत केला आहे.

या प्रकरणी लोहा पोलिसांनी दोघा सख्ख्या भावांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व ३(५) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

लोहा तालुक्यातील खांबेगाव येथील मंगलबाई अरुण कुंटे आणि वच्छलेश्वर केशव हिलाल यांच्या कुटुंबामध्ये गावातील राहत्या जागेच्या कारणावरून अनेक वर्षांपासून वाद सुरू होता. सुमारे वर्षभरापूर्वी कुंटे कुटुंबियांनी वादग्रस्त जागा विकून गावातच दुसरीकडे राहण्यास सुरुवात केली होती. मात्र, त्यांनी विकलेली जागा खरेदी करणारे पंडित रोहीजी कुंटे यांनाही हिलाल कुटुंबियांकडून त्रास दिला जात असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

रविवारी सकाळी सुमारे १०.४५ वाजता नागेश केशव हिलाल, वच्छलेश्वर केशव हिलाल, पल्लवी नागेश हिलाल आणि केशव नागोराव हिलाल हे पंडित कुंटे यांच्या घरासमोर आले. तेथे वाद घालत शिवीगाळ करून मारहाण केल्याचा आरोप आहे. यावेळी भांडण सोडवण्यासाठी गेलेले अरुण कुंटे यांनाही शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. त्यानंतर अरुण यांनी संबंधितांविरुद्ध लोहा पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचा निर्णय घेतला. बसस्थानकावर गाठून टेम्पो अंगावर घातल्याचा आरोप करण्यात आला आहे.













Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com